**वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना सुरू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र. १२६ /मावक.**
मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
**दिनांक** :- १३ जानेवारी, २०२१

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/का-१२, दि. २७ नोव्हेंबर २०१८

२) शासन निर्णय, इतर मागास, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग विमुत जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्र.सीबीसी-२०१९/ प्र.क्र.१२१ /मावक दि. ७ ऑगस्ट २०१९.

३) शासन निर्णय, इतर मागास, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग विमुत जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्र.सीबीसी-२०१९/ प्र.क्र.१२६ /मावक, दि.६ सप्टेंबर, २०१९.

**<u>प्रस्तावना</u> :-**

मा.मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि.०२ मार्च,२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने आदिवासी विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविणेबाबत विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास अनुलक्षून दिनांक ३०जुलै,२०१९ रोजी संपन्न झालेल्या मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीत आदिवासीच्या धर्तीवर १३ योजना धनगर समाजासाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार दिनांक ०७/०८/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविणेबाबत वाचा येथील अ.क्र. १ नुसार दिनांक २७ नोव्हेंबर,२०१८ च्या आदिवासी विकास विभागाने कार्यान्वयीत केलेली पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेप्रमाणेच, धनगर समाजातील विद्यार्थी जे वसतिगृहातील प्रवेशापासून वंचित आहेत त्या विद्यार्थ्यांना सदर योजना सुरू करण्याबाबत वाचा येथील अ.क्र. २ नुसार शासन शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

आदिवासी विकास विभागाच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजनेमध्ये विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरीत करण्याबाबत तरतूद आहे. तथापि सद्यस्थितीत या विभागांतर्गत वसतिगृह प्रवेशासाठी वसतिगृह प्रवेश ऑनलाईन प्रणाली अस्तित्वात नसल्यामुळे उपरोक्त वाचा येथील अ.क्र. ३ मधील दिनांक ६/९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती. यानुषंगाने खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

<u>शासन शुध्दीपत्रक :-</u>

वाचा येथील अ.क्र. ३ मधील शासन निर्णयातील “परिच्छेद ५ (क) च्या “इतर निकष” या शिर्षाखालील अ.क्र. (vi) येथील मजकुराऐवजी खालील मजकूर वाचण्यात यावा :-

**“vi) वसतिगृह प्रवेश प्रणाली अस्तित्वात नसल्याने या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांस ऑफलाईन पध्दतीने अर्ज करता येईल आणि असा अर्ज स्विकारला जाईल.”**

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.mahrashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०११३१५०४४९१३२२ असा आहे. हे शासन शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Laxman Dhakane

Digitally signed by Kailas Laxman Dhakane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Other Backward Bahujan Welfare Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6283d0b58cf739d67ca64d094986494b972b39cf4df46464c9bd30ae8293d9de, serialNumber=31cb66284a60476ac9d13a21baff0dcec39fc8bdee0aaf7155193c77d671e117, cn=Kailas Laxman Dhakane
Date: 2021.01.13 15:07:11 +05'30'

**( श्रीनाथ हेंद्रे )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन ,मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
३. मा. मंत्री, (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ, सचिवालय,मुंबई.
६. सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य, विधान भवन, मुंबई.
७. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा) मुंबई/नागपूर
८. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा ) (लेखापरिक्षा) मुंबई/नागपूर
९. मा. मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) मंत्रालय, मुंबई
१४. संचालक, इमाव, सावशैमाप्र, विजाभज व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
१५. प्रादेशिक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
१६. सहायक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
१७. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण विभाग
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१९. निवासी लेखा अधिकार, मुंबई
२०. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२१. निवडनस्ती (धसयो